# भारतीय लोकशाही

**डॉ. शितल चंद्रकांत पाटील**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय
रामानंदनगर (बुर्ली)
Email– shitalpatil01989@gmail.com

**सारांश:** भारताला स्वातंत्र्य मिळावे याकरिता दीर्घकाळ लढा सुरु होता. जहाल गट, मवाळ गट आणि क्रांतिकारक गट आपल्यापरीने भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी लढा देत राहिले. ब्रिटिशाकडून स्वातंत्र्य प्राप्त करणे हे साध्य समोर ठेऊन सर्वच स्तरावर प्रयत्न सुरु होते. परकीय राजवटीपासून मुक्तता याबरोबर सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभाग आणि समान अधिकार ही तत्वेसुद्धा स्वातंत्र्य लढ्याने पुरस्कारलेली होती. स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे बहुतेक नेते इंग्रजी शिक्षणाबरोबर ब्रिटीश पद्धतीच्या संसदीय लोकशाहीने प्रभावित झालेले होते. सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होता यावे व स्वयंशासनाचा अधिकार असावा हीच काँग्रेसची भूमिका होती. अशा या परिस्थितीत लोकशाही आणि संसदीय लोकशाही स्वीकारणे हाच पर्याय होता.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, भारतीय लोकशाही, नोकरशाही, राज्य, राजकीय पक्ष

**प्रस्तावना** –

भारताला स्वातंत्र्य मिळावे याकरिता दीर्घकाळ लढा सुरु होता. जहाल गट, मवाळ गट आणि क्रांतिकारक गट आपल्यापरीने भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी लढा देत राहिले. ब्रिटिशाकडून स्वातंत्र्य प्राप्त करणे हे साध्य समोर ठेऊन सर्वच स्तरावर प्रयत्न सुरु होते. परकीय राजवटीपासून मुक्तता याबरोबर सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभाग आणि समान अधिकार ही तत्वेसुद्धा स्वातंत्र्य लढ्याने पुरस्कारलेली होती. स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे बहुतेक नेते इंग्रजी शिक्षणाबरोबर ब्रिटीश पद्धतीच्या संसदीय लोकशाहीने प्रभावित झालेले होते. सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होता यावे व स्वयंशासनाचा अधिकार असावा हीच काँग्रेसची भूमिका होती. अशा या परिस्थितीत लोकशाही आणि संसदीय लोकशाही स्वीकारणे हाच पर्याय होता.

**लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार** –

भारतीय घटनेच्या प्रास्ताविकेत भारत हे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक असेल असे म्हटले आहे . पुढे त्यामध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द वाढवण्यात आले. राज्यघटनेत लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार दोन महत्वाच्या मार्गांनी करण्यात आला. लोकांच्या प्रतिनिधीच्या हाती सत्ता असली पाहिजे हे लोकशाहीचे पहिले तत्व राज्यघटनेत स्वीकारले आहे . लोकशाहीचे दुसरे तत्व म्हणजे आपल्या मतांची अभिव्यक्ती करण्याचे आणि आपल्या इच्छेनुसार संघटना करण्याचे व एकत्र येण्याचे प्रत्येक नागरिकाला असलेले स्वातंत्र्य होय. लोकशाहीचे तिसरे तत्व म्हणजे कायद्यासमोर सर्वांना समान संधी राज्यघटनेतील कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्वांना समान लेखले आहे. कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही. वरीलप्रमाणे लोकप्रतिनिधी निवडण्याचा नागरिकांना समान अधिकार, कायद्यासमोर समानता

व भेदभावाला बंदी, सर्वांना समान संधी आणि नागरिकांना अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य हि लोकशाही ची तिन्ही तत्वे भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेली आहेत.

**बहुमताचा कारभार म्हणजे लोकशाही नव्हे –**

बहुमताला प्रतिनिधित्व ही खरी लोकशाही नव्हे, तर सर्वांना प्रतिनिधित्व असेल तर ती खरी लोकशाही मानली पाहिजे असे जॉन स्तुअर्त मिल यांनी म्हंटले आहे. बहुमत असलेल्यानाच  अधिकार व अल्पमतातील लोकांच्या अधिकाराचा अनादर ही लोकशाही नव्हे समाजातील प्रत्येक व्यक्तीला असलेले स्वातंत्र्य व त्यांचे रक्षण करण्याची राज्याची जबाबदारी ही लोकशाही व्यवस्थेचा एक भाग आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व आहे. महत्व आहे . त्या व्यक्तीला जगण्याचा, विचार प्रकट करण्याचा, विश्वास ठेवण्याचा , आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार असला पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे व त्याचे रक्षण करण्याची राज्याची जबाबदारी असली पाहिजे.

**राजकीय पक्ष –**

देशाचा किंवा एखाद्या प्रांताचा राज्यकारभार स्थिरपणे चालवायचा असेल तर त्या काळात विशिष्ट राजकीय धोरणे राबविणारा संघटीत पक्ष असावा लागतो त्या पक्षाने बहुमत विधीमंडळात असावे लागते. एक पक्ष सत्ताधारी असावा आणि दुसरा पक्ष हा तेवढाच तुल्यबळ विरोधी पक्ष असावा. प्रत्येक राजकीय पक्षाचे विशिष्ट तत्वज्ञान असते, कार्यक्रम असतो. याआधारे निवडून आल्यावर राज्यकारभार केला जातो असे गृहीत धरले जाते. परंतु सद्यस्थितीमध्ये राजकीय पक्ष्याच्या जाहीरनाम्याना फारसे महत्व उरलेले नाही. केवळ एक ओपचारीकता म्हणून जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. तरीही राजकीय पक्ष लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे.

**नोकरशाही –**

नोकरशाही हा लोकशाही व्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. राजकिय पक्ष हा पाच वर्षाकरिता सत्तेमध्ये येतो मात्र नोकरशाही हा घटक स्थिर असतो. प्रशासकीय व्यवस्थेचे धोरण निर्धारण करणारा घटक म्हणून नोकरशाहीकडे पहिले जाते. प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम व सचोटीची असेल तर राज्याची उद्दिष्ट्ये साध्य होतात. राज्यकर्ते हे येतात आणि जातात परंतु घटनात्मक व्यवस्था दीर्घकाळ राबवण्याचे काम नोकरवर्गाला करावे लागते. नोकरवर्गाला घटनेशी एकनिष्ट राहून प्रामाणिकपणे काम करणे ही त्याची नैतिक जबाबदारी हा एक लोकशाहीचा महत्वाचा आधार आहे.

**लोकशाही जीवनपद्धतीचा अंगीकार –**

लोकशाहीचे खरे अस्तित्व हे लोकांनी लोकशाहीची मुल्ये किती प्रमाणात स्वीकारली यावर अवलंबून असते. लोकशाहीमध्ये सर्वच कामे राजकीय सत्तेने करावी अशी जनतेची अपेक्षा असते. पदोपदी सरकारी मदत मिळावी असे सर्वांना वाटते. समाजामध्ये शिक्षणाचे अपुरे प्रमाण, माहितीच्या साधनांचा गैरवापर आणि लोकशिक्षणावर राजकारण्याची कमी होत जाणारी श्रद्धा या तिन्ही गोष्ठीमुळे लोकशाहीचा महत्वाचा आधार असलेली जनतेची सजगताच मुळी कमी होते आहे.

आज भारतासमोर अनेक प्रश्न आहेत वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, श्रमसंस्कृतीचा अभाव, भूकबळी अशा  कित्येक समस्या आहेत. या सर्व समस्या बाजूला ठेवून भलतेच प्रश्न राजकारण्याकडून उस्थित केले जातात. धर्माच्या, जातीच्या आधारावर

प्रश्न उपस्थित केले जातात. निवडणुकीपुरते विशिष्ट मुद्दे समोर करून निवडणुका जिंकल्या जातात. यामुळे लोकशाही तत्वाला बाधा निर्माण होते आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय लोकशाहीला संपूर्ण जगामध्ये एक आदर्श लोकशाही म्हणून ओळखले जाते. आज भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत. परंतु विविध संरचानाच्या माध्यमातून लोकशाही बळकटी कारणासाठी प्रयत्न सुरु आहेत. कोणत्याही एका संरचनेला अधिक महत्व न देता सत्ता संतुलन राखण्याचे काम व्यवस्थेतल्या इतर संरचनाकडून होत असते म्हणूनच भारतीय लोकशाही आज अबाधित आहे. आज खर्या अर्थाने देशाचा विकास व्हायचा असेल तर लोकशाही बळकट होणे गरजेचे आहे. लोकशाही अधिक सक्षम झाली तरच देशातील प्रत्येक नागरिकांना न्याय मिळणार आहे.

**संदर्भ :**

१. तळवलकर गोविंद – सत्तातर , खंड १ व २ , मौज प्रकाशन गृह ,मुंबई १९९७

२. धर्माधिकारी दादा – आपल्या गणराज्याची घडण, परधर्म प्रकाशन

३. भारतीय लोकशाही : अंतरंग – विचार मंथन संशोधन पत्रिका, जानेवारी २०१३

४. चपळगावकर नरेंद्र – राज्यघटनेचे अर्धशतक, मौज प्रकाशन गृह मुंबई २००२

५. पळशीकर सुहास – समकालीन भारतीय राजकारण – काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००४